# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### रत्नागिरी जिल्हा परिषद विभागाने सर्वशिक्षा अभियानातंर्गत नवीन वर्गखोल्यांची बांधकामे करण्याबाबत

**(१) ५१९३ (०९-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा परिषद विभागाकडून केंद्र शासनाकडे सर्व शिक्षा अभियानाचा ५० कोटी रुपयापर्यंतचा वार्षिक आराखडा करण्यात येऊन त्यामध्ये वर्गखोल्यांसाठी कोटयावधी रुपयांपर्यंतचा आराखडा निम्म्यावर आल्यामुळे या अनुदानातून २१६ नवीन वर्गखोल्यांची आवश्यकता असताना आता या अनुदानातून वर्गखोल्यांची कामे घेणे बंद केल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यासाठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एकूण २१६ वर्गखोली बांधकामाचा आराखडा प्रस्तावित केला होता. परंतु नवीन वर्गखोली बांधकामे मंजूर नसल्याने वर्गखोल्यांचे बांधकाम करता आलेले नाही.

(२) वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रके सन २०१५-१६ मध्ये UDISE नुसार व जागा उपलब्धतेनुसार १२० वर्गखोली बांधकामे मंजुरीकरीता प्रस्तावित केली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भंडारा जिल्हा ग्रंथालय इमारतीचे प्रलंबित असलेले बांधकाम

**(२) ८८२३ (०८-०४-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील ग्रंथालय, वाचन कक्ष, सभागृह, संगणक कक्ष याकरिता तत्कालीन

जिल्हाधिकारी यांनी जिल्हा नियोजन अंतर्गत ५० लाख रुपयांचा निधी सदरील बांधकामाकरिता मंजूर करुन घेतला असून उक्त बांधकाम मागील वर्षापासून बंद पडल्यामुळे या कामाकरीता मंजूर करुन घेतलेला निधी परत जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) कंत्राटदाराने काम बंद ठेवल्याबद्दल त्याला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नोटीसा बजावण्यात आलेल्या होत्या, तसेच सदर कंत्राटदारास काळया यादीत टाकण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली होती, ही कार्यवाही सुरु असताना सदर कंत्राटदाराने दिनांक ३० मे, २०१५ पासून बांधकाम सुरु केले असून ते काम प्रगतीपथावर असून इमारत २०१५-१६ मध्ये पूर्ण होईल.

(३) कंत्राटदाराने काम बंद केल्यामुळे विलंब झाला.

---

## अमरावती येथील आदिवासी बहुल धारणी व चिखलदरा भागात शिक्षकवर्ग अपूरा असल्याबाबत

**(३) ९३०२ (०९-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील आदिवासी बहुल धारणी व चिखलदरा भागात कुपोषण कमी व्हावे, मुलांचा शैक्षणिक स्तर सुधारावा याकरिता विविध योजना राबविण्यात येत आहेत, मात्र शिक्षकवर्ग पुरेसा नसल्याने मुले शिक्षणापासून वंचित राहत असल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदिवासी भागातील मुलांना शिक्षणाचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने पुरेसा शिक्षकवर्ग भरण्याबाबत व वर्गखोल्याची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) अमरावती येथे विद्यार्थी पटसंख्येनुसार आदिवासी भागामध्ये आवश्यक शिक्षक कार्यरत आहेत. तसेच आदिवासी बहूल भागांमध्ये एकूण १५०० वर्ग खोल्या असून आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता वर्ग खोल्या आवश्यक प्रमाणात उपलब्ध आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील**
**विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्याबाबत**

**(४) ११५९१ (०९-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळामधील विद्यार्थ्यांची संख्या गत तीन वर्षात कमी झाली असून नागपूर शहरात व जिल्हयात मागील काही वर्षांपासून शासनाने इंग्रजी माध्यमाच्या सी.बी.एस.ई.पॅटर्नच्या शाळा कॉलेजला मोठया प्रमाणात मंजूरी देण्यात आल्यामुळे मराठी व हिंदी माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये दरवर्षी विद्यार्थी संख्या घटल्याने विद्यार्थी संख्येअभावी अनेक प्राथमिक व माध्यमिक मराठी शाळांमधील वर्गसंख्या कमी होऊन शिक्षक मोठया प्रमाणात अतिरिक्त होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर शहरात व जिल्ह्यात मागील काही वर्षांपासून शासनाने इंग्रजी माध्यमाच्या सी.बी.एस.ई. पॅटर्नच्या शाळा कॉलेजला मोठ्या प्रमाणात मंजुरी देण्यात आल्यामुळे मराठी व हिंदी माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये दरवर्षी विद्यार्थी संख्या कमी होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पुढे कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत तसेच बाल शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-१०-२०१५) :** (१) व (२) होय, अंशतः खरे आहे.

पालकांच्या ओढा मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पाठविण्याचा असल्याचे दिसून येते.

(३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत दुर्बल व वंचित घटकातील बालकांना विना अनुदानित शाळांमध्ये २५ टक्के जागेवर विद्यार्थ्यांना प्रवेश करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सुमारे ३८ हजार बालके शाळाबाह्य तसेच**
**शिक्षण हक्क कायद्यापासून वंचित असल्याबाबत**

**(५) १२७६८ (०९-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंदाजित ३८ हजार बालके शाळाबाह्य तसेच शिक्षण हक्क कायद्यापासून

वंचित असल्याचा अहवाल शासनाने सन २०१० मध्ये मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाला जाहीर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यांतर्गत शाळाबाह्य असणाऱ्या उक्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत शासनाने कोणती अंमलबजावणी केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सद्य:स्थिती काय आहे तसेच त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-१०-२०१५) :** (१) होय.सर्व शिक्षा अभियानाच्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक २०१०-११ यासाठी जिल्ह्यांकडून प्राप्त माहितीनुसार राज्यात ३८,३८४ मुले शाळाबाह्य होती.

(२) व (३) राज्यातील शाळाबाह्य मुलांचा शोध घेण्यासाठी दिनांक ४ जुलै, २०१५ रोजी संपूर्ण राज्यात व्यापक सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात आढळून आलेल्या शाळाबाह्य बालकांना आधार कार्ड देऊन त्यांना नजीकच्या शाळेत प्रवेश देण्यात येणार आहे. अशा पध्दतीने प्रवेशित मुले तसेच याआधी पटावर असलेल्या सर्व मुलांचे 'ट्रकिंग' सरल या संगणक प्रणालीव्दारे केले जाणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हा परिषदेच्या शासकीय शाळेच्या इमारती, देखभाल व दुरुस्तीसाठी आलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(६) १३७२६ (०८-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या शासकीय शाळेच्या इमारत बांधकाम, देखभाल व दुरुस्तीसाठी आलेला रुपये ७१ लाखांचा निधी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद व शिक्षणाधिकारी यांच्या अकार्यक्षमतेमुळे अखर्चित राहिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध योजनेतून शाळेच्या दुरुस्तीकरीता रुपये ५ लाख, रुपये ३२ लाख, रुपये ३४ लाख ही रक्कम खर्च झाली नसल्यामुळे शासनाकडे परत करण्याची वेळ जिल्हा परिषदेवर आली मात्र एकाही अधिकाऱ्याने दत्तक शाळेला भेटही दिली नसून शाळेतील शौचालय, पिण्याचे पाणी, वर्ग खोल्यांवरील छप्पर अशा गंभीर समस्या असून जिल्हा परिषद शासकीय शाळेची हीच परिस्थिती आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहसंचालकांनी निर्देश देऊनही संबंधीत अधिकारी केवळ कर्मचा-यांना कागदोपत्री त्यांच्या मुख्यालयी पाठविल्याचे दाखवितात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आली वा करण्यात येत आहे वा कसे ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) निधी अखर्चित राहिला हे खरे आहे.
(२) जि.प.मा.शाळा यवतमाळ या शाळेला मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.यवतमाळ, शिक्षणाधिकारी (प्राथ),जि.प. यवतमाळ व उपशिक्षणाधिकारी (प्राथ),जि.प.यवतमाळ, यांनी वेळोवेळी भेटी दिल्या आहेत. सन २०१५-१६ मध्ये रु.४१ लाख तरतूद उपलब्ध केली असून त्याअनुषंगाने शाळा दुरुस्तीबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) असे निदर्शनास आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे रिक्त पदांची भरती करण्याबाबत**

**(७) १५०२९ (०९-०४-२०१५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे जाहिरातीव्दारे करार पध्दतीवर ३६ सहाय्यकांची भरती करण्यात आली होती त्यापैकी १७ सहाय्यक कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, करार पध्दतीवर कार्यरत असलेल्या १७ सहाय्यक वगळून उर्वरित रिक्त जागांची भरती करण्यासंदर्भात क्रमांक वायएमयू -२०१३ (४७/२०१३) विशि-१ या शासन निर्णयाची विद्यापीठाचे कुलगुरु यांनी अंमलबजावणी केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करुन विद्यापीठाचे कुलगुरु हे नव्याने ७१ पदांची भरती करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यानुसार सदरील रिक्त पदांची भरती न करण्याची कारणे काय,
(५) असल्यास, शासन निर्णयानुसार करार पध्दतीवरील १७ सहाय्यकांना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :**(१) सध्या कार्यरत नाहीत.
(२) शासनाने विद्यापीठास नव्याने मंजूर केलेली ७१ पदे भरण्यासाठी तसेच त्यातील १७ सहाय्यकांची पदे भरताना उद्भवणाऱ्या अडचणीबाबत शासनाचे मार्गदर्शन मागितलेले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) याबाबतच्या अभिप्रायासाठी प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आलेला होता त्यांचे अभिप्राय प्राप्त झाले असून त्यानुसार विद्यापीठास कळविण्यात येत आहे.

---

**मेरा बुद्रुक (जि.बुलढाणा) या गावातील जिल्हा परिषदेच्या कन्याशाळेत एकही विद्यार्थीनी नसतानासुध्दा सदरील शाळेत तीन शिक्षक कार्यरत असल्याबाबत**

**(८) १५०६३ (०९-०४-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेरा बुद्रुक (जि.बुलढाणा) या गावात गेल्या ८ वर्षांपासून जिल्हा परिषद शाळेत एकही विद्यार्थीनी नसतानाही येथील जिल्हा परिषदेच्या कन्या शाळेत तीन शिक्षक कार्यरत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर शाळेत दोन शिक्षकांची पदे मंजूर होती. दिनांक ६ डिसेंबर, २०१४ रोजी शाळेची पटसंख्या शून्य झाल्यामुळे या शाळेवरील दोन्ही शिक्षकांना इतर शाळेत समायोजित करण्यात आले आहे.

---

**पाथरी तालुक्यातील (जि.परभणी) १० शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याबाबत**

**(९) १५१७० (०८-०४-२०१५). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी तालुक्यातील (जि.परभणी) १० शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचेकडे दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (३०-१०-२०१५) :**(१) होय.

(२) ज्या शाळांमध्ये हातपंप व बोअरवेल यांना पाणी येत नाही. तेथे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोतामधून पाणी मिळत नाही अशा शाळांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात पिण्याचे पाणी गावात उपलब्ध असलेल्या ठिकाणावरुन आणून शाळेत साठवून विद्यार्थ्यांना पिण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

---

**गडचिरोली येथील गोंडवाणा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषदेवर निकष डावलून सदस्यांच्या केलेल्या नियुक्त्या**

**(१०) १६६५४ (३०-०७-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली येथील गोंडवाणा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषदेवर उच्च व तंत्र शिक्षण विभाग मुंबई, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०११/(३६१/११)/ विशी-४ दिनांक १४ मे, २०१५ च्या आदेशानुसार केलेल्या सदस्यांच्या नियुक्त्या निकष डावलून केल्या असल्याचे दिनांक २६ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यापीठाच्या नियुक्त्या ह्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई या विभागाने दिनांक १४ सप्टेंबर, २००९ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भागमध्ये प्रकाशित केलेल्या अटी, शर्ती व निकषानुसार करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषदेवर केलेल्या सदस्यांच्या नियमबाह्य नियुक्त्या रद्द करण्यात याव्यात असे निवेदन डॉ.बाबासाहेब आंबेडकर गोंडवाना युनिर्व्हसिटी टिचर्स असोशिएशन यांनी माहे मे, २०१५ मध्ये मा.अर्थ व नियोजन मंत्री, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, प्रधान सचिव, शिक्षण विभाग, कुलगुरु, गोंडवाणा विद्यापीठ, गडचिरोली यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदरील विद्यापीठावरील नियमबाह्यरीत्या करण्यात आलेल्या नियुक्त्या रद्द करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) होय.

(४) व (५) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ११२ (बी) नुसार कार्यवाही करण्यात आल्याने, प्रश्न उद्भत नाही.

---

**औरंगाबाद येथील वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात अवाजवी शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत**

**(११) १७१६५ (३०-०७-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात अवाजवी शुल्क आकारण्यात येत असल्याने ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन व ऑल इंडिया युथ फेडरेशनतर्फे ५०

टक्के शुल्क आकारणी कमी करण्याची मागणी माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ५० टक्के शुल्क आकारणी कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१५) :** (१) याबाबत विभागास पत्र प्राप्त झालेले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाने ऑर्डिनन्समध्ये बदल करुन विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेण्याबाबतची करण्यात आलेली मागणी**

**(१२) १७५५७ (३१-०७-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठात गुणांकनाची ग्रेडिंग सिस्टीम सुरु होण्याआधी विद्यार्थ्यांना फर्स्टक्लास मिळण्यासाठी, नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांना पासिंगसाठी आवश्यक असणारे ६ ते ७ गुण दिले जायचे ते बंद झाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठाने ऑर्डिनन्समध्ये बदल करुन विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घ्यावा अशी मागणी एका सिनेट सदस्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) विद्यापीठाच्या अध्यादेशामध्ये बदल करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांना आधारकार्ड काढण्याकरीता आधारकेंद्र स्थापण्याबाबत**

**(१३) १७६५५ (०६-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.जयकुमार गोरे**

**(माण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून प्रवेशाच्या वेळी आधारकार्ड सक्तीचे करण्यात आले असून जे विद्यार्थी आहेत त्यांचेही आधारकार्ड जमा करणे आवश्यक असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांचे आधारकार्ड करणे सुलभ व्हावे याकरीता ज्याठिकाणी आधार केंद्र नाहीत त्याठिकाणी आधार केंद्र कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) दिनांक २८/९/२०१५ ते दिनांक ३/१०/२०१५ पर्यंतच्या विशेष मोहिमेंतर्गत विशेष मोहिम राबविण्यात येत असून सर्वत्र आधारकार्ड मशिन्स उपलब्ध करुन देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील अनधिकृत शाळांच्या मुल्यांकनाबाबत

**(१४) १७९१६ (०६-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनधिकृत शाळांचे मुल्यांकनाच्या निकषानुसार विभागीय शिक्षण उपसंचालक स्तरावरून त्रयस्थ समितीमार्फत फेरतपासणीचे काम सुरू असून त्यासंदर्भात अहवाल प्राप्त झाल्यावर शासनस्तरावरून अनुदान पात्र शाळांची यादी कायम करण्यात येईल, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील फेरतपासणीचे काम पूर्ण झाले आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदर प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, अनधिकृत शाळांवर कारवाई करण्यासंदर्भात तसेच अनधिकृत शाळांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंदर्भात आतापर्यंत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) अनधिकृत शाळांवर बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १८ (५) अन्वये कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील घाटी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय आणि रुग्णालयात उभारण्यात येणाऱ्या ग्रंथालयाला शासनाने निधी न दिल्याबाबत

**(१५) १८०५६ (३१-०७-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयातील घाटी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय आणि रुग्णालयात उभारण्यात येणाऱ्या ग्रंथालयाला राज्य शासनाने निधी न दिल्याने माहे जून, २०१५ मध्ये हे ग्रंथालय सुरु होणे अपेक्षित असतांनाही ते कार्यान्वित न झाल्याने सदरील इमारतीचे बांधकाम निधी अभावी प्रलंबित राहिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला निधी उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत,
(३) उक्त ग्रंथालयाकरीता त्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, उक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
सदर कामास शासन निर्णय दि.७.७.२०११ अन्वये रुपये ५,०७,३२०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकिय मान्यता दिली असून सदरील इमारतीच्या बांधकामाकरिता खालील प्रमाणे निधी उपलब्ध करुन दिला आहहे.

१) सन २०१३-२०१४ रु.१३.१० लक्ष
२) सन २०१४-२०१५ रु. १०७.३२ लक्ष
३) सन २०१५-१६ रु. ४००.०० लक्ष

ग्रंथालयाच्या इमारतीच्या बांधकामाचा कार्यारंभ दिनांक ४.३.२०१४ रोजी करण्यात आलेला आहे. सदरहू बांधकामे पूर्ण करण्याबाबतची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात दहशतवादविरोधी व सुरक्षाविषयक अभ्यासक्रमाचे**
**स्वतंत्र विद्यापीठ उभारण्याबाबत**

**(१६) १८१२७ (३०-०७-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दहशतवादविरोधी व सुरक्षाविषयक अभ्यासक्रमाचा समावेश असलेले स्वंतत्र विद्यापीठ नागपूर अथवा पुणे येथे स्थापण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सन २०१६ च्या शैक्षणिक वर्षासाठी मेडिकल मॅनेजमेंट व इंजिनिअरिंग प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परिक्षेद्वारेच प्रवेश देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय**

**(१७) १८८२७ (३०-०७-२०१५). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१६ च्या शैक्षणिक वर्षासाठी मेडिकल मॅनेजमेंट व इंजिनिअरिंग प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परिक्षेद्वारेच प्रवेश देण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदरील निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१५) :** (१) याबाबत शासनाने दिनांक २८.८.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

(२) प्रथम वर्ष वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश राज्य शासनाच्या प्रवेश परीक्षेमार्फत करण्यात येत आहे व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश राष्ट्रीय स्तरावरील संयुक्त प्रवेश परीक्षेमार्फत (JEE) करण्यात येत होते. राज्यात सदर प्रवेश प्रक्रियेमध्ये एकवाक्यता यावी व विशेषत: सदर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून हे प्रवेश राज्य शासनाच्या सामायिक प्रवेश परीक्षेमार्फत (MHT-CET) करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) सदर सामायिक प्रवेश परीक्षा (MHT-CET) इयत्ता बारावीच्या अभ्यासक्रमाच्या धर्तीवर असेल. अभियांत्रिकी/औषध निर्माण शास्त्र/वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र (प्रत्येकी ५० गुण) या दोन्हीची प्रश्नपत्रिका सामाईक असेल. तथापि, गणित (१०० गुण) व जीवशास्त्र (१०० गुण) या विषयांच्या स्वतंत्र प्रश्नपत्रिका असतील. राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परिक्षेमध्ये (MHT-CET) मध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतील. तसेच या गुणांच्या आधारे अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या स्वतंत्र गुणवत्ता याद्या तयार करण्यात येतील.

---

## राज्यातील खाजगी तंत्र शिक्षण संस्थेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान

**(१८) १९१९६ (३१-०७-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी तंत्र शिक्षण संस्थेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी नवनविन सुविधा देण्याचे आमीष दाखवून शुल्कापोटी लाखो रुपये घेत असून प्रवेश घेतल्यानंतर महाविद्यालयात सुरु केलेल्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या मुलभुत सुविधा तसेच आवश्यक शिक्षक वर्ग नसल्याने अभ्यासक्रमाचा दर्जा घसरल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकार बंद करण्याकरीता महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्न प्रत्येक शिक्षण अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी दिनांक २० सप्टेंबर, २०१३ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करुन तसेच दिनांक २४ सप्टेंबर, २०१३ पर्यंत विलंबीत शुल्क भरुन ॲकॅडमीक मॉनीटरींग करुन घेण्याची सक्ती तंत्र शिक्षण मंडळाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे तसेच तंत्र शिक्षण मंडळाच्या सुचनांचे उल्लंघन केलेल्या किती संस्थांवर व कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :** (१) नाही.

(२) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ दरम्यान महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाकडून संलग्नीत व पात्र संस्थाना ॲकॅडमीक मॉनीटरींगची माहिती दि. १३/०९/२०१३ ते २०/०९/२०१३ दरम्यान ऑनलाईन पध्दतीने भरण्याचे निदेश दिले गेले होते तसेच ज्या संस्था वरील मुदतीत माहिती भरणार नाही अशा संस्थांना मंडळाचे दिनांक १३/०९/२०१३ चे पत्रान्वये दि. २४ सप्टेंबर,२०१३ पर्यंत विलंब शुल्क रु.५,०००/- भरुन माहिती भरण्याचे निर्देश मंडळाने दिले होते.

मंडळाशी संलग्नीत असलेल्या संस्थांचे शैक्षणिक अवेक्षण दर वर्षी करण्यात येत असून,सदर बाबतीत मंडळाकडून Online पध्दतीने माहिती भरुन घेण्याची प्रणाली शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून लागू करण्यात आली.

(३) मंडळामार्फत संलग्नीत संस्थामध्ये अभ्यासक्रम मंडळाच्या नियमानुसार सुरु आहे किंवा नाही याकरीता शैक्षणिक अवेक्षण केले जाते. या शैक्षणिक अवेक्षण प्रक्रियेमध्ये मंडळाकडून संलग्नीत असलेल्या संस्थामध्ये AICTE/MSBTE/मंडळाच्या नियमानुसार आवश्यक शैक्षणिक सोयि व सुविधांची उपलब्धता आहे किंवा नाही याची खातरजमा खालील घटकाद्वारे केली जाते.

$ Governance, Policy Making &; Infrastructure Criteria

$ Administrative Criteria

$ Academic Criteria

$ Socio Economic Criteria

या चार मुळ घटकावर आधारित मंडळाने KPI Noms (Key Performance Indicator Norms) तयार केले असून त्याचे एकूण गुणांकन १९८ असे आहे या KPI Norms नुसारच संस्थाचे अवेक्षण केले जाते.

शैक्षणिक अवेक्षण केल्यानंतर ज्या संस्थेमध्ये आवश्यक त्या शैक्षणिक सोई व सुविधा नाहीत. अशा संस्थांना मंडळामार्फत MSBTE १९९७ कायद्यातील क्र.३८, कलम ३२ नुसार कारणे दाखवा नोटीस बजावली जाते व १ महिन्याची मुदत देऊन संस्थाना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली जाते. ज्या संस्था कारणे दाखवा पत्रान्वये नमुद केलेल्या त्रुटींची पुर्तता करतात अशा संस्थाच्या संबंधित अभ्यासक्रमाची संलग्नता पुढील शैक्षणिक अवेक्षणापर्यंत कायम ठेवण्यात येते. मात्र ज्या संस्था त्रुटी पुर्ण करीत नाहीत अशा संस्थामधील संबंधित अळयासक्रमाची संलग्नता पुढील शैक्षणिक वर्षापासून मंडळाकडून काढून घेण्यात येते.

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये एकूण ३० संस्थाच्या संबंधित एकूण ४४ अभ्यासक्रमाची संलग्नता काढून घेण्यात आली होती व या प्रमाणे संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांना अशा संस्थेमधील संअंधित असंलग्नीत अभ्यासक्रमामध्ये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता प्रवेश करु नयेत असे महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून कळविण्यात आले होते. त्यानुसार तंत्रशिक्षण संचालनालयाकडून या संस्थामधील असंलग्नीत अभ्यासक्रमामध्ये प्रथम व द्वितीय वर्षासाठी सन २०१४-१५ मध्ये प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता संलग्नता रद्द केलेल्या यादीतील तीन संस्थामधील खालीलप्रमाणे त्यांचे संस्था क्रमांकासमोर दर्शविण्यात आलेल्या अभ्यासक्रमांची संलग्नता रद्द करण्याबाबत निर्णय रद्द करण्यात आलेला आहे.

| MSBTE संस्था क्रमांक | अभ्यासक्रमाचे नांव |
|---|---|
| ११५९ | CO |
| १४९४ | ME |
| १४७१ | AE,ME |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यामध्ये गत अनेक वर्षे ११ वीचे प्रवेश केंद्रीय पद्धतीने दिले जात असल्याबाबत**

**(१९) १९२३२ (१०-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यामध्ये गेली अनेक वर्षे ११ वीचे प्रवेश केंद्रीय पध्दतीने दिले जात असतानाच प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर पुणे येथील स.प.महाविद्यालयाने माहे ऑक्टोबर, २०१३ च्या पहिल्या हप्त्यात १०० विद्यार्थ्यांना अनधिकृतपणे प्रवेश दिल्याच्या निषेधार्थ महाविद्यालयाच्या प्राचार्यानी राजीनामा दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित महाविद्यालयावर कोणती कारवाई करण्यात आली व अशा प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) चौकशीअंती ७७ विद्यार्थ्यांना अनधिकृत प्रवेश देण्यात आल्याचे दिसून आल्यामुळे संस्थेने स.प महाविद्यालयाच्या प्राचार्याचा राजीनामा घेतला, अनधिकृत ७७ विद्यार्थ्यांचे प्रवेश त्वरीत रद्द करण्यात आले असून त्या विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रवेश प्रक्रिया गरवारे कॉलेज पुणे येथे राबविण्यात आली आहे.

---

**महाराष्ट्रातील नविन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाची**
**अधिसभा रद्द होणार असल्याबाबत**

**(२०) १९४०९ (३०-०७-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील नविन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाची अधिसभा रद्द होणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन विद्यापीठ कायद्याचे नेमके स्वरुप काय असून सदर कायद्यामुळे विद्यापीठातील समाजाचे न्याय हक्काचे व्यासपीठ यापुढे उपलब्ध होणार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कायद्याबाबत शासन पुनर्विचार करणार आहे काय,
(४) नसल्यास, विद्यापीठामध्ये सामान्य जनता सहभागी होण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :** (१) नाही.
(२), (३), (४) आणि (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उच्च शिक्षण विभागातील सहसंचालक पदी कायमस्वरुपी नियुक्ती करण्याबाबत**

**(२१) १९४४६ (३०-०७-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या शिक्षण विभागातून १९९५ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभाग वेगळे करण्यात आले व त्याच वर्षी उच्च शिक्षण विभागात संचालकांची नियुक्ती करण्यात आल्याने उच्च शिक्षण संचालकांच्या अधीन राज्यात नऊ विभागीय सहसंचालक पदे निर्माण झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या २० वर्षापासून सहसंचालक पदांवर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती केली जाते याची नेमकी कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी लवकरात-लवकर निर्णय घेऊन सहसंचालक पदी कायमस्वरूपी नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१५-०९-२०१५) :** (१) होय
(२) सहसंचालक पदाचे सेवाप्रवेश नियमास अंतिम मान्यता प्राप्त झाली नसल्याने संहसंचालक पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त्या देण्यात येत आहेत.
(३) सहसंचालक पदाचे सेवाप्रवेश नियमास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची सहमती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिश: चर्चा करण्यात आली असून सेवाप्रवेश नियमास आयोगाची सहमती प्राप्त झाल्यानंतर विहित कार्यपध्दती पार पाडून सेवाप्रवेश नियम अधिसूचित करण्यात येतील. सदर सेवाप्रवेश नियम अधिसूचित झाल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहसंचालकांची पदे भरण्यात येतील.

---

## पुणे विद्यापीठांतर्गत बांधकाम करण्यात आलेल्या इमारतीचे बांधकाम विकास आणि मिळकत कर विभागाकडून करण्यात आलेले सर्वेक्षण

**(२२) २०६९९ (३१-०७-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विद्यापीठांतर्गत बांधकाम करण्यात आलेल्या इमारतीचे बांधकाम विकास आणि मिळकत कर विभागाकडून नुकतेच सर्वेक्षण करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सर्वेक्षणात काय आढळून आले व त्यानुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) विद्यापीठाने बहुतांश इमारतीचा मिळकतकर भरलेला असून उर्वरित इमारतीचा मिळकतकर महापालिकेने सर्वेक्षण केल्याप्रमाणे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईत शाळा आणि महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रियेत प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना आरक्षण न दिल्याबाबत

**(२३) २०७३५ (०६-०८-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत शाळा आणि महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रियेत प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना आरक्षण ठेवणे, सिडकोबरोबर झालेल्या कायद्यानुसार बंधनकारक असतांनाही अनेक संस्थांनी या नियमाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चालू शैक्षणिक वर्षापासून या नियमांची अंमलबजावणी न करणाऱ्या संस्थावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य मराठी भाषा विकास संस्था आणि साहित्य-संस्कृती मंडळ या दोन संस्थाच्या विलीनीकरणाच्या संदर्भात समितीने केलेल्या शिफारशींबाबत**

**(२४) २०८५२ (०६-०८-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मराठी भाषा विकास संस्था आणि साहित्य-संस्कृती मंडळ या दोन संस्थाच्या विलीनीकरणासंदर्भात शिफारशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या डॉ.श्रीपाद जोशी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने आपला अहवाल दिनांक १८ ऑक्टोबर, २०१३ रोजी शासनास सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने केलेल्या शिफारशींचे स्वरुप काय आहे आणि शासनाने त्यावर कोणते निर्णय घेतले आहेत,

(३) समितीच्या शिफारशींवर अदयाप निर्णय घेतले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत आणि या संदर्भात केंव्हा निर्णय घेणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :** (१) होय.

(२) राज्य मराठी विकास संस्था व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ या दोन्ही संस्थाचे एकत्रीकरण न करता त्यांचे अस्तित्व कायम राखले जावे. अशी शिफारस उक्त समितीने केली असून सदर शिफारशींच्या अनुषंगाने, या दोन्ही संस्थांच्या स्थापनेची उद्दीष्टे विचारात घेता दोन्ही संस्थाचे एकत्रीकरण करणे योग्य होणार नाही, असा निर्णय शासनाने घेतला आहे.

(३) प्रश्न उद्दभवत नाही.

---

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथील अनेक प्रमुख पदे रिक्त असल्याबाबत**

**(२५) २१२९५ (३०-०७-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथील अनेक प्रमुख पदे रिक्त असल्यामुळे परिक्षा निकाल व इतर कार्यालयीन कामकाजावर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त असलेल्या पदांवर अनेक सेवानिवृत्तांना परत कामावर घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विद्यापीठातील रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) नाही. मात्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या मान्येतेने विद्यापीठातील लिपिक संवर्गातील सेवानिवृत्त शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांसाठी दैनिक वेतनावर नियुक्त करण्यात आलेले आहे.

(३) व (४) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून सुरु आहे.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील शासकीय वसतीगृहात**
**मुलभुत सुविधा मिळत नसल्याबाबत**

**(२६) २१६८२ (३१-०७-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील शासकीय तंत्रनिकेतन येथे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना शासकीय वसतीगृहात मुलभुत सुविधा मिळत नसून सदरील वसतीगृहातील कक्षांना खिडक्या, दरवाजे नसल्याचे तसेच स्लॅब गळत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण शासकीय वसतीगृहाची दुरुस्ती करण्याबाबत व विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांचे समवेत दिनांक २/९/२०१५ रोजी वसतीगृहाची पाहणी करण्यात आली असून त्यानुसार विविक्षित दुरुस्तीच्या कामांची अंदाजित रु.३६.८४ लक्ष व विशेष दूरुस्ती करीता रु. ८.७९ लक्ष इतक्या रकमेची अंदाजपत्रके तयार करुन अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला यांना सादर करुन पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच किरकोळ दुरुस्तीची कामे दिंनाक ३/९/२०१५ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांचेकडून सुरु करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठात 'महाराष्ट्र अध्ययन केंद्र' सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२७) २१७१४ (३०-०७-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठात महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेची विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने 'महाराष्ट्र अध्यायन केंद्र' सुरु करण्याचा प्रस्ताव ६ वर्षापूर्वी मंजूर करण्यात आला असूनही अद्यापपर्यंत अध्ययन केंद्र सुरु करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यापीठात सदरील अध्ययन केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-१०-२०१५) :** (१) होय.

(२) महाराष्ट्र अध्ययन केंद्र सुरु करण्यासंदर्भात शासन स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ सुवर्ण महोत्सव योजनेच्या उर्वरित निधीची माहिती सादर करण्याबाबत**

**(२८) २२०२० (३०-०७-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ सुवर्ण महोत्सव योजनेच्या उर्वरित निधीबाबतची माहिती सादर करण्याचे आदेश नुकतेच माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून अद्याप एक रुपयांचा निधीही मिळाला नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेशाची अंमलबजावणी होण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१३-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रंथालयाच्या समस्यांबाबत**

**(२९) २२०४५ (३१-०७-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रंथालयाच्या समस्यांबाबत पुणे विभागीय ग्रंथालय संघाने माहे एप्रिल, २०१५ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना मागण्यांचे निवेदन दिले असून त्याकरीता त्यांनी दिनांक २ मे, २०१५ रोजी १ दिवसाचे धरणे धरले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनात ग्रंथालय संघाने कोणकोणत्या मागण्या केल्या असून मागण्यांसंदर्भांत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१५) :** (१) होय.
(२) ग्रंथालय संघाने वेतनश्रेणी, व्यंकप्पा पत्की अहवाल, ग्रंथालयांना वाढीव अनुदान इ. मागण्या केल्या आहेत. त्यानुषंगाने ग्रंथालय संचालनालयाने सेवकांच्या वेतन व सेवाशर्तीबाबत दि.०८/०५/२०१३ रोजी परिपत्रक निर्गमित केलेले आहे. मा.व्यंकप्पा पत्की समितीने केलेल्या शिफारशीपैकी बहुतांश शिफारशी पूर्ण केलेल्या आहेत. मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या दिनांकापासून वाढीव अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर विद्यापीठातील ४१७ महाविद्यालयात नियमित प्राचार्य नसल्याबाबत**

**(३०) २२०९६ (३१-०७-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विद्यापीठातील ४१७ महाविद्यालये नियमित प्राचार्यविना चालत असून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वाचे उल्लंघन होत असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील आयोगाच्या मार्गदर्शक तत्वाचे उल्लंघन करणाऱ्या एकाही महाविद्यालयावर अद्यापपर्यंत कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त महाविद्यालयांवर शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०७-१०-२०१५) :** (१) अंशत खरे आहे.
नागपूर विद्यापीठांतर्गत शासकीय महाविद्यालयात प्राचार्याचे १ पद, अनुदानित महाविद्यालयात प्राचार्यांची २६ पदे व कायम विना अनुदानित महाविद्यालयात प्राचार्यांची ३७५ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) प्रायाचार्यांची रिक्त पदे भरण्याकरिता महाविद्यालयांना विद्यापीठाद्वारे वेळोवेळी सूचित करण्यात येत असून बहुतांश महाविद्यालये कायम विना अनुदानित तत्वावर असल्याने, अर्हताप्राप्त उमेदवार अशा महाविद्यालयामध्ये अर्ज करण्यास इच्छुक नसतात. तसेच प्रचलित नियमानुसार आवश्यक असलेले अर्हताप्राप्त उमेदवार उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे ही पदे भरण्यासंबंधी रितसर प्रक्रिया पार पाडूनही महाविद्यालयांना पदे भरता येत नाहीत. प्राचार्य व शिक्षकांची रिक्त पदे न भरल्यास सन २०१०-११ चे प्रथम वर्षातील प्रवेश थांबविण्यात येतील, अशी सक्त ताकीद संबंधीत महाविद्यालयांना देण्यात आली होती. परंतु या महाविद्यालयांनी मा. सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली असता,ज्या महाविद्यालयात प्राचार्य नाहीत अशा

महाविद्यालयाचे फक्त प्राचार्य नसल्याच्या कारणावरुन प्रवेश थांबविता येणार नाही, असा निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला असल्याने, सदर महाविद्यालयांविरुध्द कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील इंदिरागांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या बांधकामाबाबत**

**(३१) २२१४६ (३१-०७-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील इंदिरागांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) या बहुउद्देशीय इमारतीचे आणि मुलींच्या वस्तीगृहाचे सन २०१४ मध्ये उद्घाटन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत कित्येक वर्षापासून बहुप्रतिक्षेत असलेल्या मेयोच्या विस्तारीकरणाचे काम सुरु झाले असून त्यात नवा अपघात विभाग आणि बाह्यरुग्ण विभागाच्या विस्तारीकरणाचे काम सुरु होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदारांची देयके शासनाने गत तीन महिन्यांपासून मंजूर न केल्यामुळे संबंधित ठेकेदारांकडून कामाबाबत टाळाटाळ करण्यात येत असल्याने बांधकामाचा वेग संथ झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त महाविद्यालयाच्या विस्तारीकरणाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) बहुउद्देशीय इमारत व मुलींच्या वसतीगृहाचे उद्घाटन ऑक्टोंबर, २०१३ मध्ये करण्यात आले.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

अपघात विभाग व बाह्यरुग्ण विभागाच्या विस्तारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उच्च शिक्षणासाठी तसेच स्पर्धा परिक्षांच्या तयारीसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता शासकीय व खाजगी वसतिगृहांची निर्माण झालेली कमतरता**

**(३२) २२३१० (३१-०७-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वसतिगृहात 'पॅरासाईट' म्हणून राहणाऱ्या बालाजी मुंडे या स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या तरूणाने मंगळवारी गळफास लावून आत्महत्या केली असल्याचे दिनांक १२ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च शिक्षणासाठी तसेच स्पर्धा परिक्षांच्या तयारीसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असतानाही विद्यार्थ्यांकरीता शासकीय व खाजगी वसतिगृहे शहरात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) विद्यापीठाला दरवर्षी कोट्यवधीचा निधी मिळूनही गत २० वर्षापूर्वी असणारी वसतिगृहाची क्षमता आजही तेवढीच आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-१०-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्थांनी ऑनलाईन सेवेमुळे कोणत्याही सवलती देता येत नाहीत अशी भुमिका घेतल्याबाबत**

**(३३) २२९५५ (०६-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्थांनी प्रवेश घेण्यापूर्वी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रथम जातीचा दाखला आणा अन्यथा खुल्या प्रवर्गातून प्रवेश घ्या, ऑनलाईन सेवेमुळे कोणत्याही सवलती देता येत नाहीत अशी भुमिका घेतल्याने दाखल्याअभावी खुल्या वर्गातून प्रवेश घेण्याची नामुष्की जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांवर आली असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) तद्नुसार अशा संस्थांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील शाळेतील शिक्षकांचे वेतन**
**गत ६ महिन्यांपासून मिळाले नसल्याबाबत**

**(३४) २३०४१ (१०-०८-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील सुमारे ६५० शाळेतील शिक्षकांचे वेतन गत ६ महिन्यांपासून कोषागार कार्यालयाच्या दिरंगाईमुळे मिळाले नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त जिल्ह्यातील शाळेतील शिक्षकांचे वेतन लवकरात लवकर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच कोषागार कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सीबीएससी, आयसीएसई शाळांचे गत दोन वर्षांपासून**
**मान्यतेचे नुतनीकरण करण्यात आले नसल्याबाबत**

**(३५) २३१०१ (०६-०८-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सीबीएससी, आयसीएसई अशा शाळांचे गत दोन वर्षांपासून मान्यतेचे नुतनीकरण झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील एकाही शाळेच्या प्रस्तावावर विभागाने विचार केला नसतानाही शाळांचे आर्थिक व्यवहार, शिक्षकांचे वेतन सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दर ३ वर्षाने मान्यतेचे नुतनीकरण आवश्यक असतानाही शिक्षण विभागाने कोणत्याही शाळेवर अद्यापपर्यंत कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) राज्य शासनाच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त राज्यात इतर अभ्यासक्रम चालविणाऱ्या शाळा उदा. सीबीएसई, आयसीएसई, आयजीईएस, आयबी, इत्यादी अभ्यासक्रम चालविण्यास नाहरकत प्रमाणपत्र देणे व त्यांच्या नुतणीकरणास मंजूरी देणे हा विषय शासन निर्णय दिनांक २ मे, २०१४ नुसार आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे कार्यालयाकडे सोपविण्यात आला होता. त्यापुर्वी सदर विषय शासनस्तरावर हाताळण्यात येत होता. आता दिनांक १५ मे, २०१५ च्या शासन निर्णयानुसार सदर विषय पुन्हा पुर्वीप्रमाणेच शासन स्तरावरुन हाताळला जात आहे. त्यानुसार प्राप्त प्रस्तावावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## राजभाषेच्या विकासासाठी व दिर्घकालीन नियोजनासाठी मराठी भाषा विभागाची पुर्नरचना करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३६) २३१८६ (०६-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजभाषेच्या विकासासाठी व दिर्घकालीन नियोजनासाठी मराठी भाषा विभागाची पुर्नरचना करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी अभ्यासकेंद्राने राजभाषा मराठी विभागाच्या पुर्नरचनेसाठी पाठविलेला प्रस्ताव माहे एप्रिल, २०१० पासून तब्बल दहा वेळा शासनास सादर करुनही अद्याप सदरील प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मराठी विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव अनेक वर्षांपासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :** (१) होय

(२) नाही.

मराठी अभ्यासकेंद्राच्या प्रस्तावावर शासनस्तरावर झालेल्या बैठकीमध्ये अभ्यासकेंद्राने मराठी भाषा संवर्धनाच्या विविध उपक्रमांच्या विविध कामांची विभागणी सहा उपविभागामध्ये करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तथापि सदर प्रस्तावाच्या संदर्भात मराठी अभ्यास केंद्रासमवेत दि.२१.८.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत नवीन उपविभागाकरिता अतिरिक्त मनुष्यबळ देणे शक्य होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

(३) होय.

मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यासंदर्भात अभ्यास करुन राज्य शासनास शिफारशी सादर करण्यासाठी समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) राजभाषा अधिनियम १९६४ च्या अनुषंगाने शासन व्यवहारात मराठी भाषेचा प्रभावी वापर करण्याकरिता व भाषा संवर्धनाकरिता मराठी भाषा विभागांतर्गत भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व राज्य मराठी विकास संस्था यांचेद्वारे विविध उपक्रम सुरु आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनेक विद्यापीठांना 'महाराष्ट्र राज्य ज्ञान मंडळाच्या प्रणालीचा' वापर करण्याची सक्ती करण्यात आल्याबाबत**

**(३७) २३२३७ (३०-०७-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठांना 'महाराष्ट्र राज्य ज्ञान मंडळाच्या प्रणालीचा' वापर करण्याची सक्ती करण्यात आल्यामुळे परीक्षा क्रमांक, प्रश्नपत्रिका, ओळखपत्र यामध्ये गंभीर त्रुटी, ऑनलाईन रिसीट/मार्कशीट जनरेट न होणे असे अनेक गोंधळ होत असल्याच्या तक्रारी विद्यापीठाशी संबंधित विविध संघटनांनी शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनेक विद्यापीठांची ४० दिवसांत निकाल देण्याची परंपरा असतानाही ज्ञान महामंडळाकडून होणा-या विलंबामुळे निकालास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१५) :** (१) नाही.

(२) व (३) विविध विद्यापीठांमध्ये निकालास विलंब झाला आहे हे अंशत: खरे आहे. तथापि, काही तक्रारी निर्माण झाल्यास विद्यापीठामार्फत त्या तात्काळ दुरुस्त केल्या जातात.

---

**राज्यातील नववीमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना दहावीमध्ये बसू देण्याबाबत पालक व विद्यार्थ्यांनी केलेली मागणी**

**(३८) २३२९४ (१०-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्यानुसार पहिली ते आठवीच्या मुलांना अनुत्तीर्ण करता येत नाही परंतू

राज्यात प्रतिवर्षी इयत्ता नववी मध्ये हजारो विद्यार्थी अनुत्तीर्ण होतात सदरील अनुत्तीर्ण झालेले बहुतांश विद्यार्थी शाळा सोडून देतात व काही अंशी शाळाबाह्य विद्यार्थी म्हणून १७ क्रमांकाचा अर्ज भरुन दहावीची परीक्षा देतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नववीमध्ये अनुत्तीर्ण झालेले विद्यार्थ्यांना दहावीमध्ये बसू देण्याबाबत संबंधित विद्यार्थी व पालक दरवर्षी स्थानिक प्रशासनाकडे मागणी करतात हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने दहावीमध्ये बसणे ऐच्छिक करण्यासाठी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) असल्यास, नववीमध्ये अनुत्तीर्ण झालेले परंतु दहावीमध्ये बसू इच्छिणा-या विद्यार्थ्यांना दहावीमध्ये बसू न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :** (१) हे खरे आहे,.
(२) अंशतः खरे आहे.
(३) व (४) इयत्ता ९ वी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याचे शैक्षणिक वर्ष वाया जावू नये म्हणून सदर विद्यार्थ्यांनी विहित अटींची पूर्तता केल्यास अर्ज क्रमांक १७ भरुन माध्यमिक शालांत परीक्षेस प्रविष्ट होण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

---

## अमरावती येथील तपोवनच्या जागेवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच विदर्भातील आरोग्य विज्ञान विद्यापीठ सुरु करण्याबाबतची केलेली मागणी

**(३९) २३३३० (३१-०७-२०१५). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथील तपोवनच्या जागेवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासह उक्त जागेवर विदर्भातील आरोग्य विज्ञान विद्यापीठ सुरु करण्यात यावे अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी जोपर्यंत प्रस्तावित सात शासकीय वैद्यकीय महाविद्यालये पुर्णतः कार्यन्वित होत नाही तोपर्यंत नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणे संयुक्तिक ठरणार नाही, असा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा शहरातील एका परिक्षा केंद्रावर बैठक क्षमता कमी असल्याने काही विद्यार्थ्यांची परिक्षा उन्हात कापडी पॅण्डॉलमध्ये घेतल्याबाबत

**(४०) २३३५५ (३१-०७-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा शहरातील एका परिक्षा केंद्रावर २५० परिक्षार्थ्यांची बैठक क्षमता असताना तेथे सुमारे ४०० च्यावर विद्यार्थ्यांची परिक्षा घेण्यात आली असून त्यापैकी ६० विद्यार्थ्यांची परिक्षा कडकडत्या उन्हात कापडी पॅण्डॉलमध्ये घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बैठक क्षमता कमी असतानाही ४०० विद्यार्थ्यांची परिक्षा घेण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांवर पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१५) :** (१) होय.

(२) दि.७ मे, २०१५ रोजी नागपूर विद्यापीठाच्या अन्य अभ्यासक्रमाच्या परिक्षांचे पेपर आयोजित करण्यात आले होते. परीक्षेस नेमके किती विद्यार्थी बसतील याची माहिती सदर महाविद्यालयाकडे आगाऊ प्राप्त झाली नव्हती, म्हणून विद्यार्थ्यांची व्यवस्था कापडी पॅण्डॉलमध्ये करण्यात आली.

(३) व (४) सदरील परीक्षा केंद्रास भेट देऊन त्याबाबत स्पष्टीकरण देण्यास सांगितले. अभ्यासकेंद्राने भविष्यात अशा घटनेची पुनरावृत्ती होणार नाही, अशी हमी दिली आहे. हे स्पष्टीकरण विद्यापीठाच्या परीक्षा मंडळामध्ये ठेवण्यात येत आहे.

---

## महाराष्ट्र राज्यातील आयुष संचलनालय मुंबई अंतर्गत वैद्यकीय अधिकारी व्यवसाय रोध भत्त्यापासून वंचित असल्याबाबत

**(४१) २३९६० (३१-०७-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील आयुष संचालनालयातंर्गत ४८ वैद्यकीय अधिका-यांना व्यवसायिक रोध भत्त्यापासुन वंचित ठेवण्यात आले असुन सहाव्या वेतन आयोगानुसार ३५ टक्क्याप्रमाणे व्यवसाय रोध भत्ते मंजुर असतानाही ते अद्यापपर्यंत देण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्रालयीन व संचालक स्तरावरील अधिकाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्षतेमुळे वैद्यकीय अधिकारी व्यवसाय रोध भत्त्यापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांना त्वरीत सदरील प्रलंबित भत्ते मंजुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-११-२०१५) :** (१) होय.
(२) नाही. अध्यापक संवर्गाला लागू करण्यात आला असून शिक्षकेत्तर कर्मचा-यांना लागू करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(३) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वैद्यकीय, अभियांत्रिकी व व्यावसायिक महाविद्यालयांकडून होणाऱ्या लुटीबाबत**

**(४२) २४२४३ (३०-०७-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचे शिक्षण मंत्री यांनी खाजगी विनाअनुदानीत महाविद्यालयातील शुल्कावर तसेच प्रवेशावर नियंत्रण आणणारा कायदा राज्यात लागु केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कित्येक ठिकाणी कोट्यातील एकही जागा देणगी म्हणजेच डोनेशन घेऊन भरावयाचे नसते, परंतु या सर्व जागा फक्त देणग्या घेऊनच भरल्या जातात मात्र यांची अधिकृत नोंद होत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात चालवल्या जाणाऱ्या वैद्यकीय, अभियांत्रिकी तसेच इतर व्यावसायिक महाविद्यालयामधून होणारी लुट थांबविणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१५) :** (१) होय.
(२) याबाबत शासनाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) विहित केलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्याची तरतूद आहे, तसेच प्रवेश व शुल्क विनियमन अधिनियम दिनांक १७.०८.२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून पीएचडी करण्यासाठी**
**२५७६ विद्यार्थ्यांना गाईड उपलब्ध नसल्याबाबत**

**(४३) २४३९१ (३०-०७-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून पीएचडी करण्यासाठी २५७६ विद्यार्थ्यांना गाईड उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे गाईडबाबतचे निकष शिथील करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोणते निकष शिथील करण्यात आले आहे, याचा फायदा किती विद्यार्थ्यांना झाला आहे ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१५) :** (१) नाही.

(२) होय.

(३) जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना संशोधनाची संधी मिळावी म्हणून विद्यापीठाने विद्यापीठ स्तरावरुन संधोधन मार्गदर्शकास मान्यता देण्याबाबतचे निकष विनाविलंब कमी केलेले आहे.

---

**राज्यात सन १९९१ ते २००० या कालावधीत करण्यात आलेल्या**
**प्राध्यापकांच्या नेमणुका नियमित करण्याबाबत**

**(४४) २५२१६ (३०-०७-२०१५). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन १९९१ ते २००० या कालावधीत करण्यात आलेल्या प्राध्यापकांच्या नियुक्त्या नियमित करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला व कालांतराने त्यात पुन्हा बदल केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकदा घेण्यात आलेला निर्णय बदलण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त कालावधीत किती बिगर नेटसेट प्राध्यापकांच्या नियुक्त्या नियमित करण्यात आल्यामुळे शासनाच्या तिजोरीवर किती रुपयांचा भार पडला वा पडण्याची शक्यता आहे,

(४) असल्यास, प्राध्यापकांच्या बाबतीत घेण्यात आलेल्या निर्णयास विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता घेण्यात आली आहे काय, असल्यास केंव्हा ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :** (१) शासनाच्या दि.२७ जून, २०१३ च्या निर्णयानुसार जे बिगर नेट-सेट अध्यापक दि.२३.१०.१९९२ ते दि.०३.०४.२००० या कालावधीत रुजु झालेले आहेत. अशा बिगर नेट-सेट /पी.एचडी. अध्यापकाच्या सेवा शासन निर्णयाच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) दि.२३.१०.१९९२ ते दि.०३.०४.२००० या कालावधीत रुजु झालेल्या बिगर नेट-सेट अध्यापकांच्या सेवा दि.२७ जून, २०१३ या शासन निर्णयाच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरलेला असून बिगर नेट-सेट/पी.एचडी अध्यापक त्या दिनांकांनंतर करिअर ॲडव्हान्स्मेंट स्कीमसाठी ज्या दिनांकास पात्र ठरतील, त्या दिनांकापसून कॅसचे फायदे त्यांना देय असल्यामुळे शासनावर सध्या अतिरिक्त आर्थिक भार पडण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाटणादेवी (ता.चाळीसगांव, जि.जळगांव) येथील गणिती तज्ञ भास्कराचार्य यांच्या नावाने संशोधन केंद्र सुरु करण्याबाबतची केलेली मागणी**

**(४५) २५३०१ (३०-०७-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटणादेवी (ता.चाळीसगांव, जि.जळगांव) येथील गणिती तज्ञ भास्कराचार्य यांच्या नावाने संशोधन केंद्र सुरु करण्यास लोकप्रतिनिधीनी मा.मंत्री महोदयांना लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-१०-२०१५) :** (१) होय.

(२) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव यांनी स्वनिधीमधून गणित तज्ञ भास्कराचार्य यांच्या नावाने संशोधन केंद्र सुरु करण्यासंदर्भात त्यांना शासनाच्या दि. १०.०७.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथील साक्षी संजय फुलझेले या महाराष्ट्र कराटे ऑफ मार्शल स्पोर्टस अकादमीच्या खेळाडूस आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्याकरीता आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(४६) २५३७५ (०६-०८-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील साक्षी संजय फुलझेले या महाराष्ट्र कराटे ऑफ मार्शल स्पोर्टस अकादमीच्या खेळाडूने यावर्षी इयत्ता ६ वी ची परिक्षा दिली असुन मलेशियात माहे नोव्हेंबर मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी साक्षीस बोलावणे आले आहे, परंतु केवळ घरची आर्थिक परिस्थिती प्रतिकुल असल्याने ती आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील खेळाडूने बालवयातच ३२ सुवर्ण, ४ रजत, ४ कांस्य पदके पटकावली असून नागपूर विदर्भासह कोल्हापूर, दिल्ली, जम्मू-काश्मिर, अमेरिका, पाकिस्तान, बांगलादेश आणि नेपाळ या देशांमध्ये यश प्राप्त केले असून जर्मनीतील क्रीडापटू डॉ.जैमा लार्स यांनीही साक्षीचे कौतुक केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विद्यार्थीनी खेळाडूची शासनाने दखल घेवून मलेशियात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शासनाने तिची व तिच्या सारख्या इतर गुणवंत खेळाडूची आर्थिक बिकट परिस्थिती तपासून अशा खेळाडूंना आवश्यक आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०९-२०१५) :**(१) (२) व (३) साक्षी संजय फुलझेले ही खेळाडू खेळत असलेला कराटे हा खेळ शासनाने विहीत केलेल्या खेळांच्या मान्यताप्राप्त संघटनांनी आयोजित केलेल्या स्पर्धापैकी नसून ती स्पर्धा निमंत्रिताची स्पर्धा म्हणून गणली जाते. तसेच सदर खेळाडूने पदक प्राप्त केलेल्या इतर स्पर्धा देखील महाराष्ट्र राज्य कराटे असोसिएशनच्या मान्यता प्राप्त व विहीत वयोगटात घेतल्या जाणाऱ्या अधिकृत स्पर्धामधील नाहीत कु. फुलझेले या केवळ बांग्लादेशात झालेल्या निमंत्रितांच्या स्पर्धेस गेल्याचे त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. तसेच जर्मनीतील क्रीडापटू डॉ.जैमा लार्स या नागपूर येथे पर्यटनाकरीता आलेला असताना त्यांच्या समोर झालेल्या प्रात्यक्षिकात त्यांनी कु. साक्षीचे कौतुक केल्याचे सांगितले आहे, तथापि असे प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ अंतर्गत अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तसेच सहभागी झालेल्या होतकरु खेळाडूंना प्रशिक्षण व इतर बाबींसाठी आर्थिक सहाय्य देण्यास दिनांक २८ एप्रिल, २०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर विद्यापीठाने वेगवेगळ्या पदाच्या भरती प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहारासंदर्भातील नेमलेल्या समितीच्या अहवालाबाबत**

**(४७) २६८८३ (३०-०७-२०१५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर विद्यापीठात माहे नोव्हेंबर, २०११ ते दिनांक ८ नोव्हेंबर, २०१२ पर्यंत वेगवेगळ्या पदाच्या ७६ कर्मचा-यांची भरती करण्यात आली असून या भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याने दिनांक ८ नोव्हेंबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये तीन सदस्यांची चौकशी समिती गठीत केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील समितीचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर या संदर्भात अधिक सखोल चौकशी करण्यासाठी दिनांक २८ मे, २०१४ रोजी डॉ.अरुण निगवेकर, माजी अध्यक्ष विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, सदरहू अहवालात कोणकोणत्या शिफारशी केल्या असून शिफारशींच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला असून सदरहू भरतीमध्ये अनियमितता झाल्याचे निष्कर्ष समितीने काढलेले आहेत. समितीचे निष्कर्ष शासनाने स्वीकारले असून झालेल्या अनियमिततेबाबत कार्यवाही करण्याचे आदेश दि.१० सप्टेंबर, २०१५ च्या पत्रान्वये संबंधित विद्यापीठास देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांना वितरीत करावयाच्या हस्त पुस्तिका छपाईप्रकरणी झालेला अपहार

**(४८) २७१२७ (०६-०८-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात सर्व शिक्षण अभियानाअंतर्गत शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांना वितरीत करावयाच्या हस्तपुस्तिका छपाई प्रकरणी सुमारे १३.६८ लाख रुपयाचा अपहार झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांना द्यावयाच्या प्रशिक्षण वर्गासाठी सदर पुस्तिका पुरवठा करण्यासाठी एम.एस.एस.आय.डी.सी. अकोला यांना जि.प.कडून दिनांक १९ सप्टेंबर, २०१३ ला पुरवठा आदेश दिला. पुरवठा दराने अल्पावधीत छपाई करुन दिनांक २४ सप्टेंबर, २०१३ रोजी १६०८२ पुस्तिका जि.प.पुरवठा करुन त्याच दिवशी सर्व तालुका यंत्रणांना वितरीत केल्या, हे ही खरे आहे काय,

(३) उक्त पुस्तिका छपाईकरिता एम.एस.एस.आय.डी.सी.अकोला यांनी मात्र छपाईसाठी मुकुंद आर्ट प्रिंटर्स, अकोट स्टॅंड अकोला यांना दिनांक १ ऑक्टोबर, २०१३ रोजी पुरवठा आदेश निर्गमित केला असताना एम.एस.एस.आय.डी.सी. अकोला यांचेकडून उक्त पुस्तिका छपाई आदेश दिनांक १ ऑक्टोबर, २०१३ रोजी दिला असता प्रत्यक्षात दिनांक २४ सप्टेंबर, २०१३ रोजी कशा वितरीत करण्यात आल्या,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालयामार्फत तत्कालिन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांचेकडून दिनांक १९/९/२०१३ रोजी सदर हस्तपुस्तिका छपाईचा आदेश MSSIDC अकोला यांना देण्यात आला व Delivery Challan नुसार दिनांक २४/९/२०१३ रोजी छपाई केलेले साहित्य सुस्थितीत प्राप्त झाले आहे. सदर प्रकरणात कोणत्याही प्रकारचा आर्थिक अपहार झालेला नसून संपूर्ण कार्यवाही नियमानुसार करण्यात आलेली आहे.

---

## प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी शासनाने सन २००९-१० मध्ये शासकीय तंत्र प्रशाळा केंद्र सुरु केल्याबाबत

**(४९) २७१९६ (३१-०७-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी शासनाने सन २००९-२०१० मध्ये शासकीय तंत्र प्रशाळा केंद्र सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांची पदनिर्मिती अद्याप करण्यात आलेली नसल्याने हे तंत्र प्रशाळा केंद्र बंद पडण्याच्या मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पदनिर्मिती न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१५) :** (१) होय, राज्यातील पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रमाचा अनुशेष दूर करण्यासाठी राज्यामध्ये एकूण ३४ नवीन शासकीय तंत्र माध्यमिक शाळा केंद्रे सुरु करणे व ३ विद्यमान शासकीय तंत्र माध्यमिक शाळा/केंद्रामध्ये तुकडी वाढ करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) ३४ पैकी ३१ नवीन शासकीय तंत्र माध्यमिक शाळा/केंद्राना १३२ शिक्षक/शिक्षकेत्तर पदांना पदनिर्मितीची मान्यता दिली आहे. ३ विद्यमान संस्था शासकीय तंत्र माध्यमिक शाळा/केंद्र, कुर्ला जि. मुंबई उपनगर, शासकीय तंत्र माध्यमिक शाळा/केंद्र, अंबड व भोकरदन, जि. जालना या संस्थाकरीता १८ पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या प्रस्तावित नव्या कायद्यानुसार**
**अधिसभा (सिनेट) रद्द करण्याबाबत**

**(५०) २७३१२ (३०-०७-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या प्रस्तावित नव्या कायद्यानुसार अधिसभा (सिनेट) रद्द करण्याबाबत डॉ.अरुण निगवेकर यांच्या समितीने शासनाकडे शिफारस केली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) सध्याच्या अधिसभा (सिनेट) मध्ये वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ञांचे अस्तित्व असून ते विद्यापीठ क्षेत्रातील जनतेचे व्यासपीठ ठरल्यामुळे अधिसभा (सिनेट) रद्द करण्यात येवू नये याची मागणी लेखी निवेदनाद्वारे विविध क्षेत्रातून शासनाकडे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिसभा (सिनेट) रद्द होणार नाही यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.